Maharashtra Times, Pune, March 19, 2012. Pp.19

# विद्यार्थ्यांपुढे उलगडले अवकाश

## डॉ. नारळीकरांनी सांगितल्या खगोलशास्त्रातल्या सुरस गोष्टी

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

सूर्य पश्चिमेलाही उगवताना दिसतो...आकाश निळे का दिसते...चंद्रावर सूर्यग्रहण दिसेल का...सूर्य का चकाकतो..सूर्याचा राक्षसतारा झाला तर काय होईल....अशा अनेक प्रश्नांची उकल वैज्ञानिक कारणे सांगत करून ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी खगोलशास्त्रातील चमत्कार विद्यार्थ्यांपुढे उलगडले. वारजे येथील मॉडर्न हायस्कूलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ही बौद्धिक मेजवानी मिळाली. 'यश मिळविण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. त्यासाठी मेहनत करावी लागते,' असा संदेशही त्यांनी दिला.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वारजे येथील मॉडर्न हायस्कूलतर्फे शनिवारी यशंवतराव चव्हाण नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ आणि आयुकाचे संस्थापक डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि खगोलशास्त्राविषयी उत्सुकता निर्माण करण्यासाठी 'खगोलशास्त्रातील सुरस व चमत्कारिक गोष्टी' यावर डॉ. नारळीकर यांनी व्याख्यान दिले.



यावेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, नगरसेवक सचिन दोडके, शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब हगवणे, बांधकाम व्यावसायिक विवेक शर्मा, मुख्याध्यापिका मानसी शास्त्री आदी मान्यवर उपस्थित होते. 'खगोलशास्त्रात दिसते तसे नसते. त्याचे गणित वापरणे आवश्यक असते. चमत्कार असतात, मात्र त्यांची कारणे वैज्ञानिकांनी दिली आहेत. त्यामुळे जादूटोणा नसतो,' असे डॉ. नारळीकर यांनी सांगितले.

सूर्य पूर्वेला उगवतो हे सगळ्यांनाच माहिती आहे. अक्षांश आणि पृथ्वीच्या गतीमुळे सूर्य पश्चिमेकडून उगवताना आपण पाहिला असल्याची सुरस माहिती डॉ. नारळीकर यांनी दिली. 'सूर्याचा प्रकाश सरळ रेषेत येत नाही. वायू आणि धुळीच्या कणांवर तो आपटल्यामुळे पसरला जातो. त्यात सूर्यप्रकाश सर्वांत जास्त निळ्या रंगात विखुरल्यामुळे आकाश निळे दिसते. चंद्रावर वायुमंडळ नसल्यामुळे तेथे उतरल्यावरही अंतराळवीर एकमेकांबरोबर बोलू शकत नाहीत,' असे त्यांनी सांगितले.